# जुहू येथील चंदन सिनेमाच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा

## १५ मीटरपर्यंत उंचीच्या बांधकामास उच्च न्यायालयाकडून परवानगी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** लष्करी तळांच्या परिसरातील बांधकामांबाबत संरक्षण मंत्रालयाने १९७६ मध्ये काढलेली अधिसूचना जुहू येथील प्रसिद्ध चंदन सिनेमाच्या पुनर्विकासाच्या आड येऊ शकत नाही, असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले. तसेच, चंदन सिनेमाचा १५ मीटरपर्यंतच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा केला.

संरक्षण मंत्रालयाच्या या अधिसूचनेनुसार, जुहू येथील लष्करी तळाच्या परिसरातील बांधकामांवर निर्बंध घालण्यात आले होते. मात्र, न्यायमूर्ती सुनील शुक्रे आणि न्यायमूर्ती फिरदोश पुनीवाला यांच्या खंडपीठाने संरक्षण मंत्रालयाच्या अधिसूचनेबाबत



उपरोक्त बाब स्पष्ट केली. तसेच चंदन सिनेमाचे मालक समीर बैजानाथ जोशी यांना १५ मीटरपर्यंतच्या पुनर्विकासाला परवानगी दिली. विकास नियंत्रण नियमावलीनुसार, नवीन संरचनेचा काही भाग सिनेमागृह असणार आहे. मात्र, नव्याने आराखडा सादर केल्यावरच याबाबतच्या सर्व गोष्टी स्पष्ट होतील, असे याचिकाकर्त्यांतर्फे न्यायालयाला सांगण्यात आले.

चंदन सिनेमा इमारत मोडकळीस आल्याने ती पाडण्याची सूचना महानगरपालिकेने केल्यानंतर मार्च २०१७ पासून इमारत वापरात नव्हती. याचिकाकर्त्यांनी १२ हजार ७२२.२२ चौरस मीटर चटई क्षेत्रफळ निर्देशांक वापरून जमिनीपासून ५०.७० मीटर उंचीची ११ मजली इमारत बांधण्याचा प्रस्ताव दिला होता, त्याला भारतीय विमानतळ प्राधिकरणानेही ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) दिले होते. मात्र, सिनेमाची इमारत लष्करी तळाच्या परिसरात असल्याने प्रस्तावासाठी महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा क्षेत्राच्या मुख्यालयातून ना हरकत घेण्याचे आदेश महापालिकेने याचिकाकर्त्यांना दिले.